जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०१.०७.२०२५**

'' वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या एक दलाल महिला आरोपीस गुन्हे शाखेकडुन अटक ''

दिनांक ३०/०६/२०२५ रोजी रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती चेतना चौधरी यांना माहिती मिळाली की,''हॉटेल रूची लॉजिंग आवारात, सोनारपाडा, कल्याण शिळ रोड, डोंबिवली पुर्व या ठिकाणी एक महिला दलाल काही पिडीत व असहाय्य महिलांना फुस लावुन वेश्यागमनासाठी बोलवणार आहे.'' सदर मिळालेल्या माहिती वरून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पोलीस पथकाने सदर ठिकाणी सापळा लावून एक दलाल महिलेस ताब्यात घेवुन तिच्या रखवालीत असलेल्या ०३ पिडीत महिलांची सुटका केली आहे.

सदर प्रकाराबाबत महिला आरोपीविरूध्द मानपाडा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नंबर । ७४६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १४३(१), १४३(३), ३(५) सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दिनांक दाखल करण्यात आला असून आरोपी महिलेस अटक करण्यात आली आहे.

सदर कारवाई ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि/चेतना चौधरी, मपोउपनि/स्नेहल शिंदे, सपोउपनि/डी.के.वालगुडे, पोहवा/३६६३ आर.यु. सुवारे, पोहवा/११५० के.बी.पाटील, पोहवा/३६६३ आर.यु.सुवारे, मपोअमं/८१३१ पी.जी.खरात, मपोअंम/२१७ एच.आर.थोरात, चापोशि/५९३३ एस.सी.पाटील यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर